# क्रांतिकारी शहीद राजगुरू

विद्यार्थी मित्र – मैत्रिणींनो नमस्ते,

तुम्ही शिवराम हरि राजगुरू यांचे नाव कधी ऐकले आहे का? कुणाला सांगता येईल का ते कोण होते? अगदी बरोबर. राजगुरू हे भारताचे अतिशय धाडसी आणि शूर स्वातंत्र्यसैनिक होते.

२४ ऑगस्ट १९०८ रोजी त्यांचा जन्म खेड येथे झाला. हे खेळ म्हणजे आत्ताचे राजगुरुनगर बर का. लहानपणापासूनच त्यांच्यात देशप्रेम आणि धाडस दिसून येत होते. त्यांचे वडील लहानपणीच वारले, पण तरीही त्यांनी कधी हार मानली नाही.

राजगुरूंना संस्कृत भाषा शिकायला खूप आवडत असे. ते खूप हुशार आणि चपळ होते. याचबरोबर ते उत्तम नेमबाज (निशाणा साधणारे) होते.

राजगुरू पुढे हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेत सामील झाले. या संघटनेत भगतसिंग आणि सुखदेव थापर हे त्यांचे जिवलग मित्र होते. चंद्रशेखर आजाद बटुकेश्वर दत्त हे इतर त्यांचे सहकारी होते.

तुम्हाला माहिती आहे का? त्या काळात इंग्रज भारतीयांवर खूप अत्याचार करत होते.

सायमन कमिशन विरोधात लाला लजपतराय यांनी मोर्चा काढला होता. या मोर्चात लाला लाजपत राय यांच्यावर इंग्रजांनी लाठीचार्ज केला आणि त्यांचा त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांचा हा मृत्यू या तरुण क्रांतिकारकांसाठी क्रांतीची ठिणगी ठरला.याचा बदला घेण्यासाठी राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांनी योजना आखली.

**मग त्यांनी जॉन सॉन्डर्स याच्यावर हल्ला केला.**

या वेळी राजगुरूंनी पहिली गोळी झाडून आपले धैर्य दाखवले. यानंतर इंग्रजांनी त्यांना अटक केली आणि तुरुंगात टाकले. तुरुंगातही ते खूप धैर्याने वागत होते. त्यांनी कधीही भीती दाखवली नाही.

राजगुरू यांच्या विषयी छोटीशी गोष्ट तुम्हाला सांगू का ज्यामधून राजगुरूंचे धैर्य तुमच्या लक्षात येईल. तर ऐका हा..

एकदा राजगुरू आपल्या मित्रांसोबत होते. त्यावेळी त्यांच्या धाडसाची परीक्षा घेण्यासाठी एकाने विचारले, **“तू खरोखरच इतका धाडसी आहेस का?”**

राजगुरूंनी काहीही न बोलता हातात गरम लोखंडाचा तुकडा घेतला आणि शांतपणे हातावर ठेवला.

त्यांच्या हाताला जखम झाली, पण त्यांनी अजिबात आवाज काढला नाही. हे पाहून सगळे थक्क झाले!

त्यांनी समजले की राजगुरू फक्त बोलण्यात नव्हे, तर खऱ्या आयुष्यातही खूप धाडसी आहेत.

तुम्हाला आश्चर्य वाटेल की फक्त २२ व्या वर्षीच त्यांनी देशासाठी आपले प्राण दिले.

२३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना फाशी देण्यात आली. आज आपण मोकळेपणाने जगतो, ते त्यांच्या बलिदानामुळेच आहे. राजगुरूंचे धैर्य, त्याग आणि देशप्रेम आपल्याला नेहमीच प्रेरणा देतात.

चला, आपण सर्वजण या महान क्रांतिकारकाला मनापासून वंदन करूया.